## प्रकरण तिसरे

# अशोक व्हटकर ह्यांच्या कादंबऱ्यांमधील अनुभवविश्व

# प्रकरण तिसरे

# अशोक व्हटकर ह्यांच्या कादंबऱ्यांमधील अनुभवविश्व

३.१ प्रास्ताविक

३.२ 'मेलेलं पाणी' (१९८२) मधील अनुभवविश्व

३.३ '७२ मैल' (१९८९) मधील अनुभवविश्व

३.४ समारोप

३.५ संदर्भ व टीपा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# प्रकरण तिसरे

# अशोक व्हटकर ह्यांच्या कादंबऱ्यामधील अनुभवविश्व

## ३.१ प्रास्ताविक :

मागील दुसऱ्या प्रकरणामध्ये आपण मराठी कादंबरी वाङ्.मयाची प्रारंभापासूनची वाटचाल पाहिली. तसेच दलित कादंबरीकारांचे योगदान पाहिले. प्रस्तुत तिसऱ्या प्रकरणामध्ये अशोक व्हटकर लिखित 'मेलेलं पाणी' आणि '७२ मैल' ह्या दोन कादंबऱ्यामधील अनुभवविश्वाचा अभ्यास करावयाचा आहे.

## ३.२ 'मेलेलं पाणी' (१९८२) मधील अनुभवविश्व :

'मेलेलं पाणी' ह्या कादंबरीची सुरुवात कादंबरीमधील प्रमुख व्यक्तिरेखा यल्लाप्पा ह्याच्यापासून होते. तो एका भिंतीला टेकून बसलेला असतो. त्या भिंतीवरती 'वीरशैव कक्कैय्या समाज' अशी पाटी लावलेली असते. त्या ठिकाणी बसून तो दूरवर घुमत असलेल्या डोंगराकडील आवाजाकडे लक्ष देत असतो. तो आवाज म्हणजे नवीन धरणाचे काम चालू असते. जुने धरण जे इंग्रजांनी बांधलेले असते ते केव्हाही कोसळण्याच्या स्थितीत असते. म्हणून सरकारकडून नवीन धरणाचे काम चालू झालेले असते. आता त्या आवाजाची यल्लापाला सवय झालेली असते.

अचानक त्याच्या मनात निराशेचे सावट उभे राहते. कारण गावचा राजकीय विषय त्याला आठवतो. गावातील राजकारणाने यल्लापा चिंताग्रस्त झालेला असतो. गावातील राजकारणानेच सुडापोटी ढोरांच्या ओढ्याकाठच्या चुनाड्या बंद कराव्या लागणार असतात. गावातील प्रत्येक राजकीय गट हा ढोर, महार, चर्मकार, मांतग ह्या खालच्या समाजास वापरणार असतो. त्यांच्या मतांवर डोळा ठेवून तो त्यांना खोटी आश्वासने देत असतो.

- धरणाची भिंत सरकारकडून लवकरात लवकर दुरुस्त करुन घेणे.
- गावाच्या गायरानात उभ्या करावयाच्या कारखान्यासाठी भरीव प्रयत्न करणे.
- भूमिहीन हरिजनांना जमीन मिळवून देणे, त्यांच्या धंद्यांना कर्ज देणे.

- गावातील अस्पृश्यता पूर्णपणे नष्ट करणे.
- महारवाडा, ढोरवाडा, ह्यामधल्या ओढ्यावर पूल बांधणे.

सरपंच दादाजीराव नाईकाने दिलेल्या आश्वासनांची यादी पाहून यल्लापाला राजकारणी लोकांचा तिरस्कार वाटतो.[१] राजकीय वादावादीत ढोर समाजात भांडणे, मारामारी होतात. त्यामुळे ढोरवाड्यात प्रचंड दहशत आणि भीतीची अवकळा पसरलेली असते. ग्रामपंचायतीची झालेली निवडणूक हा यल्लापाचा अतिशय अप्रिय विषय झालेला असतो.

यल्लापा आता सावकाश ढोरवाड्याच्या दिशेने चालू लागतो. ढोरवाडा म्हणजे गावातील भयंकर गलिच्छ अशी वस्ती असते. गावाबाहेरच्या ओढ्याकाठच्या उंचवट्यावर लाथ मारुन घराबाहेर काढावे, त्याप्रमाणे ढोरांची वसाहत असते. गाव वेशीच्या आत दूरवर असते. यल्लापा खाली ओढ्याच्या दिशेने दलदल तुडवित निघालेला असतो. एखादा मनुष्य वाकूनच जाऊ शकेल इतक्या तोकड्या उंचीच्या चौकटी असलेली कित्येक दारे ढासळलेल्या मानवतेसारखी कित्येक ठिकाणी वाकलेली असतात. कोणतेही घर बांधताना रस्ता, गटार, पायवाट ह्यांचा अजिबात विचार केलेला नसतो. त्या ठिकाणी रस्ता असा कसा तो नसतोच. भिंतीच्या कडेकडेने जाणे, हाच तेथील रस्ता. त्याच रस्त्याने गुरे, ढोरे, सांडपाणी जात असल्याने सगळा रस्ता रबरबीत चिखल झालेला असतो. त्यावर माशा, डास ह्यांची घनदाट वस्ती झालेली असते. ढोरांचा धंदा म्हणजे कातडी कमावण्याचा. त्यामुळे प्रत्येक घरापुढे उबारन असते. सहा-सात फूट लांब आणि तीन-चार फूट रुंदीच्या तितक्याच खोल असलेल्या ह्या बांधीव खड्ड्यातील पाण्यात जनावरांची कातडी भिजत ठेवलेली असते. ते पाणी हिरड्याचा चुरा व बाभळीची बारीक बारीक फुटलेली साल ह्यांच्या संपर्काने लालभडक झालेले असते. उबारणीच्या दोन्ही बाजूंना तिकाटने उभे करुन त्यावर मांडीइतका जाड खांब टाकलेला असतो. त्यावर जवळजवळ तयार झालेली पण कच्ची कातडी मुरत ठेवण्यासाठी टाकलेली असते. कातड्याच्या मोठ्या पिशव्या करुन त्यात बाभळीच्या सालीचा बारीक चुरा आणि हिरड्याचा बुक्का भरलेला असतो आणि ह्या पिशव्या त्या उबारणीवर आडव्या टाकलेल्या, आढ्यावर अडकवलेल्या असतात. अशा पिशव्या अडकवलेल्या उबारणीला 'दुकान' असे नाव असते. असे दुर्गंधीयुक्त दुकान जवळजवळ

प्रत्येक घराशेजारीच असते. बहुतेक घरांचा उंबरा आणि उबारन ह्यामध्ये फक्त एकदोन फुटाचेच अंतर असते. सवयीने लोकांची नाके मेलेली असतात. यल्लापा चिखल तुडवीत ओढ्याच्या दिशेने जातो. त्याठिकाणी जवळजवळ पंचवीस एक चुनाडी असतात. बहुतेक सर्व चुनाडीत कच्ची केसासहित असलेली कातडी मुखण्यासाठी टाकलेली असते. यल्लापाच्या स्वत:च्या दोन चुनाड्या असतात. त्यात मुरवत ठेवलेली कातडी तो काढून दुसऱ्या चुनाडीत टाकत असे . चुनाडीत उतरल्याने चुन्यामुळे अंगावरचे केस व कातडी जळते. पण त्याला इलाज नसतो. त्याचे पूर्वज ह्याच पद्धतीने धंदा करीत होते. हिरडा-सालीच्या पाण्यात चुन्यात वारंवार काम केल्यामुळे यल्लापाच्या हातावरच्या सर्व रेषा जळून अदृश्य झालेल्या असतात. हातापायाची नखे लालभडक झालेली असतात. हे रोजचेच काम यल्लापा नित्यनियमाने करत असतो. चांगले तयार झालेले कातडे तो गुरुवारच्या वडगावच्या बाजारात नेत असे. तो ते कातडे चांभारांना विकून आपला उदरनिर्वाह करत असे. यल्लापा हा थोडा धार्मिक असल्याने ढोरवाड्यातील मठात विठ्ठल रखमाईच्या आरतीला तो जात असे. आरतीच्या अगोदर श्रीधरस्वामींच्या 'पांडवप्रतापा'चे वाचन होत असे. मठातील बुवामहाराज अध्याय वाचून दाखवत असे. मध्येच श्रीकृष्णाचे नाव आले की भाविक हात जोडत असत. एकदा यल्लापा मठाबाहेर बसून 'महाभारत' ऐकत होता. पांडवांनाही वनवास भोगावा लागला, कंदमुळे खाऊन दिवस काढावे लागले हे ऐकून शेजारी चिलीम ओढत बसलेल्या परसूलाल्याने म्हटले, ''देवास्नीबी वनवास चुकला नाही तित आमा सरक्याचं काय हाल असतील, तेला गनती हाय का? आमी तरी मानस...'' त्यावर परसू म्हणाला, ''पांडवाचं काय घेऊन बसलास, बारा वर्सानं का हुयीना तेआस्नी तेचं राज मिळालंच का न्हाई?'' 'व्हय'.

''तसं आमासरक्याचं हाय का?'' परसू म्हणाला, ''आमाला जलमाचा वनवास, ढोर म्हणून जलमापासनं मरीस्तोवर न्हावा...'' हे संभाषण ऐकणाऱ्या नाना म्हेतरने त्यावर मलम लावण्याचा प्रयत्न केला तो म्हणाला, ''पांडवपरतापात लिवलंया तसं.. आदल्या जल्मीची पापं म्होरल्या जल्मी अशी नडत्यात. कुत्र्यामांजराचा न्हायतर चंडाळाचा, ढोराम्हाराचा जलमच मिळला पाहिजे पाप्यास्नी.'' नाना ढोराचं हे बोलणे यल्लापालासुद्धा पटते. ''खरचं,

आपल्या मागल्या जलमीचं पापच आहे'', असे म्हणून तो समोरच्या पिंडीकडे आणि विठ्ठल रखमाईच्या मूर्तीकडे लक्ष देतो. त्याक्षणी यल्लापाचे मन पेटून उठते आणि 'कशासाठी? कशासाठी ही भजन आणि पूजा?... कामधंदा, पोटपाणी सोडून का लागावं ह्यांच्या मागं? बामनं भजनं गात्यात, कुरवाडीबी म्हंत्यात, आमीबी म्हणतो... पर आमाला कंदी तेनी आपलं म्हणलयं...?'' असं मनाशीच विचार करतो आणि प्रसाद घेऊन तो मंदीरातून बाहेर पडतो.[२]

यल्लापा दुसऱ्या दिवशी वडगावच्या बाजारात जाण्याची तयारी करतो. तो आणि परसू ढोर गावाच्या फाट्यावर एस.टी.ची वाट बघत थांबतात. तालुक्याला जाणारा सरपंच दादाजीराव नाईक हा तिथेच येऊन थांबतो. ढोरांनी आपणाला निवडणूकीत मदत केली नाही म्हणून त्याचा ढोरांवरती राग असतो. ढोरांचा धंदा ओढ्यावरुन उठवून लावण्याचा प्रयत्न त्याने चालवलेला असतो. त्यामुळे त्याची ढोरवाड्याला दहशत बसलेली असते. ''परसू ढोर...'', ओल्या वादीचा तडाखा बसावा त्याप्रमाणे सरपंचाने हाक मारली. अगोदरच जातीच्या कमीपणानं खजीलवार असलेल्या त्या दोन ढोरांना ही दहशत आणि तंबी म्हणजे जणू मृत्यूचे आंमत्रणच वाटले. परसू दीनपणे हात जोडून नमस्कार करतो. कालच्या गावसभेला एकही ढोर नव्हता म्हणून तिरस्काराने दादाजीराव त्यांना ''सापाची जात'' म्हणून त्यांची अवहेलना करतो. यल्लापाला भयंकर संताप येतो. तो जर ढोर नसता तर आपल्याला 'साप' म्हणणाऱ्याला त्याने रस्त्यात पायताणाने मारले असते. दादाजीराव मराठा होता. वडगावकडे निघालेली एस.टी.हातकणंगल्याहून आली. दादाजीराव आपल्या इच्छेनुसार सावकाश रस्त्याच्या कडेला आला. गाडी पाहताच परसूने सुटकेचा श्वास टाकला. यल्लापा आणि परसू एस.टीत चढतात आणि वडगावला जातात. वडगावात यल्लापाला आपल्या व्यवसायात लागणारे जनावराचे कातडे पुरविणारा हारळ्या महार भेटतो. हारळ्याची परिस्थिती बेताची असते. त्यामुळे यल्लापा हारळ्याला धान्य भरुन देतो. आपला मित्र येसबा चांभार ह्याला कौटुंबिक आधार देतो. तिघेजण मिळून नाग्या मांगाच्या दारुच्या अड्ड्यावर जातात. त्याठिकाणी ते दारु पितात. दारुचे पैसे यल्लापा देतो. दारु पित असताना ते आपल्या जातीला चिकटलेले असताना दिसतात. अस्पृश्य जातीमध्ये देखील जातीयता

दिसते. त्यावर कादंबरीकार पुढीलप्रमाणे प्रकाश टाकतो, ''येसबा जरा आखडून बसला कारण तो चांभार होता. यल्लापा त्याचा मित्र असला तरी तो ढोर आहे, हे येसबाच्या मनातून जाणे शक्य नव्हते. येसबा त्याबाबतीत यल्लापाहून श्रेष्ठ होता. हारळ्या हा महार होता. यल्लापा त्याला भारी होता. इतकेच नव्हे तर हारळ्या नाग्या मांगाच्या हातातला कप घेत नसे, त्याला शिवत नव्हता. कारण महार हा मांगापेक्षाा उच्च होता. ही रीत अभावितपणेच पाळली गेली.''[३] एकमेकांची खुशाली विचारुन ते आपापल्या गावी जाण्यासाठी उठतात. यल्लापा आपल्या संसारासाठी लागणारे साहित्य खरेदी करतो. एवढ्यात दादासाहेब नाईकाचा दोस्त हुकीरे फौजदार यल्लापाला 'यल्ल्या' म्हणून हाक मारतो. तालुक्यातला बदनाम फौजदार म्हणून त्याची ख्याती असते. दादासाहेबांच्या सांगण्यावरुन तो यल्लापाला दमदाटी करतो. ''भडव्या जरा जातपात वळकून ऱ्हा की. लई तेगार करतूयास अशी तकराद आलीया माझ्याकडे।'' असे बोलल्यावर यल्लापाचे धाबे दणाणतात. ''त्वा गावात जातिवाद वाडीवलास. सर्वांस्नी त्वा फूस लावलीस. आन वरच्या जाती आपले दुष्मन हायीत आसं म्हन्लस.. '' हुकीरे बोलू लागला, ''तू यकलाच न्हायीस...परशा, नाना म्हेतर आशी बी नाव हायीत.''[४] यल्लापाला ते ऐकवेना काय बोलावे ते त्याला सुचेना. ''गावात मराठा, बामन, महार, मांग गुन्यागोविंदानं नांदत असताना तुम्ही ढोर तेज्यात काळे घालतायसा.''

''खोट हाय हे,'' कसाबसा यल्लापा म्हणाला त्याच्या कल्पनेत नसलेला आरोप त्याच्यावर लादला गेला होता. कलेक्टरांची नोटीस दादाजीराव आणतो. ढोरांच्या चुनाड्यामुळे गावची गुरे-ढोरे मरतात. पाणी अशुद्ध बनते, अशी तक्रार करतो. नोटीस आल्याने ढोरवाड्यातील सर्व ढोर घाबरतात. नाना म्हेतर, परसू व यल्लापा हे ढोरांची मिटिंग बोलावतात. जर सरकारने ह्या चुनाडी मुजवल्या तर कोठे जावयाचे ह्याचा विचार करावा लागणार असतो. यल्लापा तर देशोधडीला लागून, मूळ गावातील घरदार विकून येथे आलेला असतो. येथे बस्तान बसत चालले असता डोंबाऱ्याचे पाल उठवावे त्याप्रमाणे त्याला पुन्हा उठावे लागणार असते. गेल्या सोमवारपासून हुकीरे फौजदाराची आठवण झाली की कुणीतरी आपल्या काळजाला डाग द्यावा, तसा तो घाबरा होत होता. चारचौघात हुकीऱ्याने आपली अब्रू घेतली, ह्याचा धसका त्याने घेतलेला असतो.

नाना म्हेतराचा मुलगा बापू हा एकटाच ढोरवाड्यातील शिक्षित पोरगा. तो बी.ए. झालेला असतो. तहसीलदार होण्याचे त्याचे स्वप्न जात नडल्याने पूर्ण होत नाही. आपल्या शिक्षणाचा उपयोग आपल्या समाजासाठी करण्यास तो सज्ज झालेला असतो. ढोरांच्या धंद्यावर आलेले संकट टाळण्यासाठी आपल्या शिक्षणाचा, ओळखीपाळखीचा उपयोग करावयाचा आणि त्यानंतर शहराचा रस्ता धरावयाचा असे तो ठरवतो. त्यासाठी तो सरपंच/मामलेदार/कलेक्टर ह्यांना अर्ज लिहिण्याचे ठरवतो.

एव्हाना ढोरांच्या विहिरीत कुणी अर्भक टाकल्याची वार्ता येऊन पोहोचते. एका संकटाचा सामना करत असताना ढोरांच्यावर दुसरे संकट येऊन पडते. ढोरांची एकच विहीर असल्याने पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न [illegible] त्यांच्यासमोर पडतो. बापू त्यांना महारांच्या विहीरीतील पाणी आणण्यास सांगतो. यल्लापाही ह्या गोष्टीस विरोध करत नाही. पण ढोरांचा पुढारी असलेला परसू म्हणतो, ''खुळा का काय बापू तू?''

''म्हार कुठं, आपुन कुठं, आपली जात लई दांडगी हाय. गळ्यात लिंग घालतो आपून,'' नाना बापूला समजावयाच्या सुरात म्हणतो, ''तुला ठाव न्हाय बापू आपल्या धर्मात तर तसं सांगिटल्याल न्हाई. जैना, बामनांच्या हिरीजवळ पाणी मागून घेतल्यालं परवडत, पर म्हाराच्या हिरीतनं हक्कानं पाणी घेतलं, तर आपला धरम बुडतो.''[५] ह्यावरुन जातीयतेचे विष खालच्या जातीमध्ये सुद्धा कशाप्रकारे दडले आहे, ते स्पष्ट होते. धर्माच्या नावाखाली अज्ञानामुळे पूर्वीपासून जातीयता माणासाच्या मनात दाटलेली असते, हे दाखविण्यात कादंबरीकाराला यश आलेले दिसते. बापूला मात्र हे पटणे शक्यच नव्हते. तो म्हणतो, ''आपल्या दारातच उबारनी आहेत. चुनाड्यातून आपण लोक उतरतो. उघड्या हातांनी घाणेरडी कातडी सोलतो, शिवतो, नवा कुणी माणूस इथं आला तर तो इथल्या घाण वासानं बेशुद्धच पडेल.'' पण ढोर समाजातील वृद्ध लोकांना ते पटत नाही. नाईलाजास्तव यल्लापा हा बाळगोंडा पाटील जो जैनाचा असतो, त्याच्या विहिरीवर पाणी आणावयास जातो. पण जातीने जैन असणारा बाळगोंडा पाटील यल्लापाला आणि त्याच्याबरोबर आलेल्या बायकापोरांना शिव्या घालतो. गावातील राजकारणामध्ये ढोरांनी आपल्या उमेदवारास मते

दिली नाहीत म्हणून दादाजीरावाबरोबरच बाळगोंडसुद्धा चिडून असतो. तो म्हणतो, ''जावा... रांडच्यांनो, तुम्ही ढोर चांभार पक्की हरामखोर. द्या जावा की त्याला मतं... निवडून द्या जावा त्याला. आमच्या जिनगोंडाला पाडा.''

''पर आन्ना, आमी विलक्शनला कुनालाबी मत दिलं नाय, तुमानी ठाय हाय. आमी आपली मजूर गरीब. आमानी मोठ्यांच्या लडतीत न्हाय पडायचं,''[६] यल्लापा म्हणाला मस्तवाल बाळगोंड मात्र त्यांचे काहीच ऐकून घेत नाही. उलट आपली विहीर ढोरं बाटवतील म्हणून तो यल्लापाला हुसकावून लावतो.

आतापर्यंत ते अर्भक कोणाचे, ह्यावरुन गावात बराच तणाव निर्माण झालेला असतो. गावातील बालकमंदिरात असलेल्या हरिजन बाईबरोबर अनैतिक संबंध ठेवणाऱ्या सरपंचाचे नाव सगळ्या गावाला कळते. गावातील देसाईपार्टीची माणसे उघडउघड दादाजीरावाचे नाव घेत होती. ढोरांना हे माहित होते, पण ते दादाजीरावापुढे काहीच करु शकत नाहीत. विहिरीतील अर्भक काढले जाते. विहीरीची पूजा घातली जाते. आणि पुन्हा ती पिण्याच्या पाण्यासाठी खुली केली जाते. ह्या सर्व भानगडीत यल्लापाला आपले काम बंद करावे लागते. यल्लापाला कातडी पुरविणाऱ्या हारळ्या महारालासुद्धा एकाही जनावराचे कातडे मिळत नाही. त्यामुळे त्याचे उपासतापास चालू राहतात. पोटाचा प्रश्न मोठा झाल्याने तो वडगावच्या एका तेल्याचा रेडा विष घालून मारतो. पण तो त्यात सापडतो. वडगावच्या संबंध तेल्याच्या आळीचा मार त्याला खावा लागतो आणि जेलमध्येही जावे लागते. पोटासाठी धडपडणाऱ्या हारळ्याविषयी यल्लापाला समजताच तो त्याच्यासाठी कोर्टखटला खेळण्यासाठी तयार होतो. कोर्टकचेरी कधीही न खेळणारा यल्लापा आपल्या हारळ्या महार ह्या दोस्तासाठी तयार होतो. हारळ्याची बायको राधी आणि तिची पोरे अन्नासाठी वणवण भटकत असतात. त्यांच्यासाठी तो हॉटेलमधील भजी आणखी काहीतरी घेऊन देतो.

आपल्या ढोर समाजातील शिकलेल्या बापूबद्दल यल्लापाच्या मनात खूप आदर असतो. बापू ढोरांच्यासाठी झटतो आहे, कलेक्टराला ढोरांच्या चुनाडीबाबत भेटतो आहे, ह्याचे त्याला नवल वाटते. ह्याच दरम्यान गावामध्ये समजासेवेचे व्रत धारण करणारे गुरुजी व त्यांचा शिष्य आनंद ह्यांचे आगमन होते. गुरुजी व आनंद दोघेही ढोरवाडा, महारवाडा,

चांभारवाडा साफ करण्याचे काम करतात. बापू आणि यल्लापा त्यांना मदत करतो. गावातील गायरान जमीन ही दलितांना मिळाली पाहिजे, ह्यासाठी हे सर्वजण संघर्ष करतात. आणि येथूनच कथानकाला कलाटणी मिळते. संबंध गावचा रोष बापूवर, गुरुजी आणि यल्लापावर वाढतो. सरपंच दादाजीराव नाईक-पाटील तर गावाला त्यांच्याविरुद्ध उभा करतो. गायरान जागेवर साखर कारखाना बांधण्याचे त्याचे स्वप्न असते. त्यामुळे ह्या मागणीला तो विरोध करतो. अगोदरच चुनाड्याबाबत बापूचे आणि सरपंचाचे वैर वाढलेले असते. तशातच ह्या दुसऱ्या कारणाने आणखीनच वैर वाढत जाते. तो ह्या मुद्दयाचे राजकारण करतो. जमीन वाटपाच्या अर्जावर आम्हाला फसवून सह्या घेतल्या, अशी जबानी सरपंच दादासाहेब नाईक हा महार, मातंग, चर्मकार ह्यांना द्यावयास सांगतो. त्यामुळे भयभीत झालेले लोक दादासाहेब जसे सांगतो, तसे पोलिसात साक्ष देतात, त्यामुळे गुरुजी ह्या प्रकरणात फसतात. उलट गावामध्येच गुरुजी फुट पाडत आहेत, त्यांना यल्लापा, बापू, नाना म्हेतर साथ देत आहेत. अशांची गाढवावरुनच धिंड काढली पाहिजे, असे बोलतो. जे ढोर, चर्मकार, महार बांधव जमीन मिळणार म्हणून गुरुजींच्या बापूच्या मागे उभे असतात, तेच लोक गुरुजींना दादासाहेबांच्या धाकात येऊन शिव्या द्यायला, मारायलासुद्धा मागेपुढे पाहत नाहीत. गावातील चावडीसमोर हुकीरे फौजदार, सरपंच दादाजीराव, हणमंत देसाई, बाबूराव, लिंबाजी, गावातील प्रत्येक माणूस जमतात आणि गुरुजींना, यल्लापाला, आनंदला मारहाण होते. गुरुजींना मारण्यात ज्यांचे भले करण्यासाठी गुरुजी झटत होते, त्यामध्ये ढोर होते, चर्मकार होते, महार होते, गावाच्या विकासासाठी, अस्पृश्यांचा उद्धार होण्यासाठी झटणाऱ्या गुरुजींचा ह्यातच शोकमय मृत्यू होतो. मागासवर्गीय लोक ज्या ज्या वेळी आपल्या उत्कर्षासाठी झटतात , त्या त्या वेळी सवर्ण लोक एकत्र येऊन ते होऊ देत नाहीत. मागास हे मागासच राहिले पाहिजेत, असा जो सवर्ण समाजाचा दृष्टिकोन असतो, तो दृष्टिकोन कादंबरीकाराने येथे उलगडून दाखवला आहे.

गुरुजींचा झालेला मृत्यू यल्लापाच्या आणि बापूच्या मनाला दु:खद चटका लावून जातो. अशातच यल्लापा आपल्या थोरल्या मुलीचे रंजीचे लग्न लावण्याची तयारी करतो. पण गावातीलच हणमंतराव देसाईचा धाकटा भाऊ बाबूराव हा तिच्यावर बलात्कार करतो.

बलात्कारीत रंजीला कोणी लग्न करुन घेण्यास तयार होत नाही. पण यल्लापाच्या पैशाला बघून एक स्थळ कबूल होते. सासरी गेल्यानंतर रंजीचा छळ चालू राहतो. माहेरुन पैसे आणत नाहीस म्हणून तिच्या हातांवर, ओठांवर, स्तनांवर, मानेवर, कपाळावर, पायाच्या, हाताच्या तळव्यावर डाग देण्याचे काम तिची सासू, नणंद, नवरा करतो. यल्लापाला हे पाहवत नाही. तो आपल्या मुलीस आपल्याकडेच ठेवून घेण्याचे ठरवतो. तो तिचे सोडपत्र घेतो.

आतापर्यंत यल्लापाच्या घराची झालेली वाताहत बापू आपल्या डोळ्यांनी पाहतो. यल्लापाच्या मुलीशी तो लग्न करण्याचे ठरवतो. सर्व घराचा समाजाचा विरोध डावलून तो हे लग्न करतो. गुरुजींनी दिलेल्या शिकवणुकीचा त्याच्यावर संस्कार झालेला असतो. बापू ढोरांच्या चुनाडीबाबतची केस जिंकतो. यल्लापाचा बापूविषयीचा आदर वाढतच जातो. अशातच गावामध्ये जोरजोरात वादळी पाऊस सुरू होतो. त्यामुळे ढोरांच्या चुनाड्या भरतात. त्याठिकाणाची घाण वाहून गेलेली असते. गाळ चुनाडीत पडलेला असतो, घरांची सुद्धा पडझड झालेली असते, बापू आणि रंजी दोघेही मनाने खचतात. त्या रात्री बापूचे वडील नाना आपल्या कारखान्याच्या दारात असलेल्या झाडाखाली बसलेला असतो. वादळ वाऱ्याने ते झाड नानाच्या अंगावर कोसळते. त्यातच नानाचा मृत्यू होतो. बापूला नानाचे अत्यंस्कार करावे लागतात.

तिसऱ्या दिवशी परत वादळवाऱ्याला सुरुवात होते. पहिल्या दोन दिवसापेक्षा जास्तच पाऊस कोसळू लागतो. हजारो मजुरांनी उभारलेली, इंजिनिअरच्या टाळक्यातच फक्त साकार झालेली धरणाची भिंत हजारो जागी फुटते आणि आणि मधल्या वेळक्यात साठलेले पाणी दगड लाथाडीत गावाच्या उताराकडे धावू लागते. अद्यापही धरण फुटले नव्हते. धरणातील पाण्याची पहिली लाट गावातल्या जैन आळीवर येऊन आदळते. पहिल्या तडाख्यातच जैन आळी जमीनदोस्त होते. जैन आळी सपाट करुन एक महाकाय लाट नाईकपाटलाच्या आळीत उतरते. ती लाट नाईकपाटलाच्या आळीतून सरळ देसायांच्या आळीत उतरते. मग लिंगायत आळ्या सपाट करीत ब्राह्मण आळीत शिरते. गावातील लोकांना वाचवण्यासाठी हारळ्या महार, यल्लापा ढोर, परसू ढोर, शिवा, तानाजी काहिली पाण्यातून घेऊन येऊ लागतात. त्यांना पाहताच गावच्या लोकांना आधार वाटतो. ज्या

ढोराचांभारांना त्रास देण्यासाठी जे लोक आपला पुरुषार्थ समजत हाते, आपली जात श्रेष्ठ समजत होते, तेच लोक आता हारळ्याला, यल्लापाला देवापेक्षाही श्रेष्ठ मानतहोते. ज्या बापूला, रंजीला गावाने त्रास दिला त्या गावाला वाचविण्यासाठी बापू बळ एकवटून दुसरी काहिल घेऊन पाण्यात उतरतो. रंजी, बापू हे अनेक लोकांचे प्राण वाचवतात. ज्या बाबूरावाने रंजीवर बलात्कार करुन तिचे आयुष्य उद्ध्वस्त केलेले असते, तीच रंजी आता अकाली प्रसूत होणाऱ्या बाबूरावाच्या बायकोला वाचवित असते. हे दृश्य बघून बाबूराव शरमतो. तो मान खाली घालतो. बाबूरावाला धीर देऊन दोघे शारदेला त्याच्या बायकोला उचलून गच्चीवर आणतात. वारा, पाऊस एकाएकी थांबतो आणि पुन्हा एकदा ''कडाडऽकडाड ऽ धडधडऽ'' असा आवाज दूरवरून डोंगराच्या बाजूने येतो. दूरवर हजारो माणसे किंचाळतात, ''धरान फुटलं... धरान फुटलं आसऱ्याला पळा ..!''

एका इंजिनिअरने बापूला सांगितलेले धरणातील डेडवॉटर थोडा वेळ गेल्यानंतर मोकळे झाले होते. दहा मिनीटातच पूर्वीच्या दोन लाटांहून कित्येक पटींनी उंच अशी भयानक लाट गावभर धडधडत येते आणि मातीचा खडा वाहावा त्याप्रमाणे सगळा गाव घेऊन जाते. ह्या प्रचंड लाटेने ढोरांची उंच टेकडीसुद्धा व्यापते. कमरेएवढे पाणी टेकडीवरती येते. ह्याच टेकडावर गावातील वाचलेले लोक आश्रयाला आलेले असतात. निसर्गानेच सगळ्या भेदाभेदाला, जातीयतेला, स्वार्थाला तिलांजली दिलेली असते. आमदार हणमंतराव, सरपंच दादाजीराव, बाळगोंड, लिंबाजी अशी शेकडो माणसे तिथे ढोरांचा आश्रय घेऊन कुडकुडत बसलेली असतात.

## ३.३ '७२ मैल' (१९८९) मधील अनुभवविश्व :

प्रस्तुत कादंबरीचा नायक अशोक आहे. वयाच्या बाराव्या वर्षी अशोकला त्याचे वडील साताऱ्याच्या बोर्डिंगमध्ये घालतात. अशोकला साताऱ्याच्या बोर्डिंगमध्ये करमत नाही. तो अपल्या गावी कोल्हापूरला पळून जाण्याचे निश्चित करतो. जवळ पैसे नसल्याने साताऱ्यातून पायी जाण्याचेच ठरवतो. कोल्हापूरला पोहोचेपर्यंत एकूण तीन दिवसांचा पायी प्रवास करावा लागतो. ह्या तीन दिवसांच्या प्रवासात त्याला राधाक्का नावाची त्यांच्या आईला शोभेल एवढ्या वयाची स्त्री भेटते. त्या तीन दिवसांमध्ये राधाक्काच्या निमित्ताने अशोकला

जगाचे, जीवनाचे विदारक दर्शन घडते. त्याच्या मनाचा थरकाप करुन टाकणारा अनुभव म्हणजे '७२ मैल' ही कांदबरी.

कादंबरीची सुरुवात अशोकला साताऱ्याच्या बोर्डिंगमध्ये त्याचे वडील टाकतात अशी होते. लहानपणी रानोमाळ भटकलेल्या, दिवस-दिवसभर तळ्यात पोहणाऱ्या अशोकला बोर्डिंग म्हणजे तुरुंगच असे वाटते. पाहिल्याच दिवशी अशोक खूप खूप रडतो. हे त्या बोर्डिंगच्या चालकांच्या लक्षात येते. ते अशोकला जवळ बोलावतात. त्याच्या पाठीवर हात फिरवतात आणि हातावर पावली ठेवतात. ''जा, जरा गावात फिरुन ये.... सातारा फार चांगले आहे. तुला बरे वाटेल.. जा रडू नको. तू चांगला मुलगा आहेस मला माहित आहे.'' असे समजावणीच्या भाषेत ते बोलतात. [७] फिरायचे, भटकायचे म्हटल्यावर आणि चालकांची माया पाहून अशोक खूश होतो. साताऱ्याच्या मधल्या रस्त्याने तो फिरतो. साताऱ्याच्या बाजूस असलेला किल्ला व बोर्डिंगच्या मागच्या बाजूला असलेल्या पर्वतांच्या शेपट्यांच्या अखेरच्या टेकड्या तो पाहतो. नजरेच्या टप्प्यात मावणारे, दोन जवळजवळ काटकोनात असलेल्या डोंगराच्या कोनात वसलेले सातारा शहर पाहून अशोक आंनदित होतो. अचानक त्याची नजर बाजूला असलेल्या एस्.टी स्टॅण्डवर जाते. अशोक स्टँडवर येतो. तेथे उभ्या असणाऱ्या एस्.टी.मध्ये 'सातारा-कोल्हापूर' ही गाडी दिसते का, ते पाहतो. पण त्यावेळी अशी गाडी नसते. काही प्रवाशांना तो विचरतो पण त्याला अपेक्षित असलेली माहिती मिळत नाही. अशोक दु:खी होतो. त्याला घरची, आईची आठवण तीव्रतेने येत असते. शेवटी भुकेची आठवण होते, अशोक दिवसभर भटकत असल्याने बोर्डिंग चालक बोर्डिंगच्याच मुलांना अशोकला शोधण्यासाठी पाठवतात. अशोक त्या मुलांना दिसतो. त्याला चालकांसमोर उभे करण्यात येते. चालकांची गालावर सणसणीत थप्पड खावी लागते. असाहाय्यपणे तो रडत बसतो. पुन्हा एकदा तो साताऱ्यात चालकांचा डोळा चुकवून फिरायला जातो. साताऱ्यात ढोर वस्तीत आपल्या मामाची मुलगी आहे हे अशोकला माहीत असते. तो त्याठिकाणी जातो. पाहुण्याला पाहताच ती त्याला बोलवते. त्याला जेवायला घालते आणि न मागता दोन रुपये देते. अशोक त्या ठिकाणाहून निघतो आणि पुन्हा एकदा तो एस्.टी.स्टँड दिसते का ते पाहतो. स्टँडच्या शेजारी असलेल्या पंक्चरच्या दुकानाजवळ

तो बसतो. संध्याकाळ झालेली असते. तोपर्यंत दारु प्यालेले तिघेजण अशोकजवळ येतात. त्याच्याजवळचे पैसे देण्यासाठी धमकावतात. पण अशोक त्यांना पैसे देण्यास नकार देतो. आपला तोल सावरीत त्यातील दोघेजण अशोकला पकडतात आणि एकजण लाथाबुक्क्या घालतो. त्याचा हात पिरंगाळून त्याच्याजवळचे पैसे काढून घेतले जातात. वेदनेने अशोकचे हातपाय आणि अंग ठणकते. त्याचा अंगावरचा शर्ट फाटला जातो. त्याच्या मनात त्या गुंडाविषयी भयंकर संताप येतो. त्याचबरोबर त्या बोर्डिंगबद्दलही संताप येतो. अशोक त्या बोर्डिंगमध्ये परत न जाण्याचा निश्चय करतो. आपल्याला बेवारशाप्रमाणे येथे आणून टाकणाऱ्या आईबापाबद्दल एकूणच साऱ्यांबद्दल चीड त्याच्या मनात दाटून येते. आणि आहे त्या स्थितीत तो साताऱ्यातून कोल्हापूरला पायीच जाण्याचा निश्चय करतो. जे कोल्हापूर साताऱ्याहून बाहत्तर मैल दूर असते. रात्र होते आणि पोटात भूकेची जाणीव हाते. कोठे रस्त्यात घर, खोपटे दिसते का हे तो पाहतो. थोडया वेळाने त्याला एक खोपटे दिसते. खोपटाजवळ जाऊन तो 'कोन हाय का?' असे विचारतो. आतून एका म्हातारा कंदील घेऊन येतो. अशोकला तो जरा संशयाने पाहतो. एक सामान्य, खत्रुड, मरके पोर आपल्यापुढे उभे आहे. त्याच्यापासून आपल्याला कोणताही धोका नाही, हे पाहिल्यावर तो जरा शांत होतो. अशोक त्याच्याकडे पाणी मागतो. तो त्याला पाणी देतो, आणि 'येथे बस' म्हणतो आणि आपल्या शिवारातील भुईमुगाच्या शेंगा राखणीला तो निघून जातो. अशोक तेथेच रात्रभर झोपतो. सकाळी उठून तो रस्त्यावर येतो. तोपर्यंत मागून चालत येणारी एक बाई त्याला दिसते. तिच्याबरोबर तिची लहान पोरेही चालत येत असतात.

अशोक त्यांच्याकडे जास्त लक्ष न देता कुठेतरी पाणी मिळेल ह्या आशेने भरभर पावले टाकत चालू लागतो. भरभर चालण्याने ती पोरे आणि ती बाई बरीच मागे राहतात. कोणत्याही परिस्थितीत कोल्हापूर गाठायचेच, ह्या इराद्याने तो चालू लागतो पण विधिलिखीत वेगळेच असते. येथून पुढचा प्रवास त्याला त्या महार असलेल्या राधाक्कासोबत आणि तिच्या पोरासोबत करावा लागणार असतो. अशोक त्यांच्यापुढे जात असताना पुढे वाटेत त्याला शेकोटी पेटवलेली दिसते. एक जाड बाई आणि तिचा गाडीवान नवरा व एका सोळा-सतरा वर्षाचा पोरगा शेकोटीच्या धगीला आरामात बसलेले दिसतात. अंगातील थंडी

घालवण्याच्या उद्देशाने अशोक त्या शेकोटीजवळ पोहोचतो. "जरा पाणी पेतो", असे म्हणत अशोक घागरीतील पाणी आपल्या स्वत:च्या हातांनी पितो. त्याला कोणी विरोध करत नाही. बैलगाडी जुंपली जाते. पुढील प्रवासासाठी ते कुटुंब जाण्यासाठी तयार होते. त्याला गाडीत घेतले जाते. दयाळू वाटणाऱ्या त्या गृहस्थाकडून थोडीशी सुपारी दिली जाते. तो अशोकला विचारतो.

"जात कोन म्हनावी रे तुजी?"

"म्हरात्याचं दिसतयं" ती बाई उद्गारायला आणि अशोकच्या तोंडून खरे बाहेर पडायला एकच गाठ पडते. "ढोराचा" इंगळी डसावी तसा तो माणूस जागचा हालतो. आतापर्यंत प्रेमळ बोलणारा मायाळू असणारा तो गृहस्थ अशोककडे रागाने डोळे विस्फरुन पाहू लागतो. त्याचबरोबर ती बाई आणि तिचा मुलगा. आता त्यांच्या नजरेतील विरक्तता वगैरे अदृश्य होते. फसवणूक, अपमान वगैरे भावनांनी त्यांचा चेहरा क्षणार्धात पलटतो. त्या माणसाची लाथ अशोकच्या मांडीवर जोरदार बसते आणि चालत्या गाडीतून तो मागे उडून पडतो. आणि क्षणार्धात रस्त्यावर आडवा होतो. तो माणूस उभा आडवा चाबकाने अशोकला फोडू लागतो. अशोक अक्षरश: ढुंगण घसरत रस्त्याच्या कडेला येतो. कारण दुरुन एक ट्रक येत असतो. अशोकच्या ढोरपणाने एवढी मोठी शिक्षा त्याला मिळालेली असते.

ती महारीण आणि तिची पोरे पाठीमागून चालत येत असतात. भराभरा चालत आपल्या पोरांना मागे टाकत ती अशोककडे येते. "ढोरासारख बडविलं की गे बाये पोराला ! माणूस का हैवान म्हणावा भाड्या!" अशी ती ओरडते. अशोकचे हात, पाय, पाठ तपासते आणि भरमसाठ शिव्या त्या गाडीवानाला घालते. अशोक ढोर आहे हे समजताच त्यांच्यामध्ये सख्य व्हायला वेळ लागत नाही. अशोकला ती 'आस्सुक्या' म्हणू लागते. अंगावर झालेल्या जखमांवर दगडी पाला शोधून त्याच्या अंगावर ती लावते. तसा सर्वांचा प्रवास सुरु होतो. त्यांच्या सर्व भावंडामध्ये थोरला असलेला राणू दूरदूर भटकत सर्वांच्या पुढे जात असतो. काहीतरी करवंदाची जाळी, एखादे फळझाड किंवा असेच काही तरी मिळते का हे ते पाहत असतो. नागठाणे गाव जवळ आलेले असते. रस्त्यात असणाऱ्या बेलफळांच्या झाडावरील अनेक बेलफळे सर्वजण खाली पाडतात. पोटाला काहीतरी मिळाले आणि

जवळच असलेल्या नदीचे पाणीसुद्धा मिळाले त्यामुळे सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद दिसू लागतो.

सगळ्यांचा संयुक्त प्रवास सुरु होतो. राधाक्काच्या काखेत असलेले मरणप्राय पोर-सुंदर अखेर आपला प्राण सोडते. सुंदरला गाडल्यानंतर ती सारी मंडळी पुढे चालू लागतात. पोटाला भुकेची जाणीव होत होती. पुढे उंब्रज गाव आल्यानंतर राणूच्या बोलण्यावरुन ही सारी मंडळी भीक मागणार होती. उंब्रजच्या स्टँडवर भीक मागायची ही कल्पना अशोकला सहन होत नाही. उंब्रजचे एस्.टी.स्टँड जवळ येईल तसे अशोकची छाती धडधडू लागते. कुठून झक मारली आणि ह्या मंडळीच्या कचाट्यात सापडलो असे त्याला वाटू लागते. राणू, अशोकच्या हातात पितळी टाळ नसल्याने दोन दगड देतो. आणि बापाने शिकविलेले गाणे म्हणू लागते. अशोक त्यांच्या पाठीमागून दगडावर दगड आपटू लागतो. ते गाणे असे होते.

''वाटंच्या रं वाटसरू

म्हंचील बाबा यंव करू न् त्यंव करू....''

राणूच्या आवाजात विलक्षण गोडवा आणि टिपरी घुमल्यासारखा खणखणीत बोलवा असतो. एस्.टी. त बसलेल्या एका वृद्धाला राणूचे गाणे हे फारच आवडते. तो भान हरपून ऐकत असतो. कंडेक्टरला एस्.टी. थांबवायला सांगून तो खाली उतरतो. एका हॉटेलात शिरतो आणि खुपसे खायला आणून देतो. उंब्रजच्या स्टँडवरुन सारी मंडळी पुन्हा चालू लागतात. रात्र कधी झाली ते समजत नाही. एका झाडाखाली ते सर्वजण झोपतात.

दुसऱ्या दिवशी चंदर सकाळपासून गमतीला येतो. हा चंदर म्हणजे मेलेल्या सुंदरचा जुळा भाऊ . त्याच्यापेक्षा चंदर हा ठणठणीत असतो. त्या दिवशी सकाळी रस्त्यावर एक पूर्ण वाढ झालेला नाग पाहण्याचे सर्वांनाच भाग्य लाभते. सकाळचे नऊ वाजलेले असतात कराडजवळ येताच कराड आल्याचा सर्वांना आनंद होतो. ती सारीजण पुन्हा भीक मागणार असतात. अशोक त्याला विरोध करतो. कराड स्टँडवर न मागीतलेली भीक ते तिघे रस्त्याकडेच्या छोट्या टपऱ्या हॉटेलात मागतात. तिथे भीक मिळत नाही. राणू उसाचे फटके बसत असतानाही आठ-दहा ऊस एका बैलगाडीतून उपसतो आणि धूम पळत सुटतो. त्याच्या मागे गाडीवान लागतो. गाडीवान तेथून गेलेला पाहताच राधाक्काच्या दोन पोरी

गाडीवर तुटून पडतात. गाडीवान त्यांच्या आयाबहिणींचा उद्धार करतच राणूची पाठ सोडून पोरींच्या मागे लागतो. रस्ता संपतासंपत नव्हता. प्रत्येक वेळी कोल्हापूर सोडून नवेच गाव आढळते. आता एका बाजूला जवळ डोंगर दिसू लागतो. आणि त्याच्या अलीकडे काही डेरेदार झाडे, झुडपे. त्या डोंगरात खायला काही मिळते का, ते आपण दोघेजण पाहून येऊ असे राणू अशोकला म्हणतो. राधाक्का त्याला नको म्हणत असतानाही राणू तिचे ऐकत नाही. राणू आणि अशोक रस्ता सोडून डोंगराच्या दिशेने पळू लागतात. राधाक्काला इच्छा असूनही अडवता येत नव्हते. आगतिक होऊन ती रस्त्याच्या कडेला बसते.

ओढ्याओघळाच्या परिसरात, गारव्यात जिथे नागीण आपली वीण घालते अशा ठिकाणी दुर्दैवाने राणू आणि अशोक जातात. नागिणीची वीण अशा ठिकाणी असेल याची कल्पना दोघांनाही नसते. त्या ठिकाणी दोन-चार आवळ्याची झाडे दिसतात. आवळयाच्या कल्पनेने दोघांच्याही तोंडाला पाणी सुटते. पहिल्या उडीत अशोक आवळ्याची फांदी पकडतो आणि लोंबकाळू लागतो, हलवू लागतो. राणू आवळे वेचत झाडापासून दूर जातो. अचानक त्याच्या मरणप्राय किंचाळण्याने अशोक दचकतो. राणू आवळे टाकून जीव घेऊन बेभानपणे वेडावाकडा पळत असलेला दिसतो. त्याच्यामागे कोण लागले आहे ह्याचा लगेच बोध होणे अशोकला शक्य नव्हते. राणू शेवाळी खडकावर क्षणार्धात दाणदिशी आपटतो. विजेच्या वेगाने त्याचा पाठलाग करणारी भयंकर नागीण त्याच्या अंगावर बसून कडाडा चावा घेते. हे सारे दृश्य अशोक स्तंभित होऊन पाहतो. आता आपली पाळी ह्या कल्पनेनेच घाबरुन जातो. झाडावरुन धपकन खाली उडी मारतो आणि राधाक्काकडे धाव घेतो. एव्हाना राणू मृत झालेला असतो. पोटच्या पोराचा देह लांबून पहावा लागणे, नागिण अंगावर असल्याने त्याचे मर्तिक करता न येणे, त्याचे डोके मांडीवर घेऊन विलाप करता न येणे... आणि इथेच त्याला बेवारशी कुत्र्यासारखे सडवत ठेवून निमुटपणे जाणे, ह्या कल्पनेने राधाक्काच्या तोंडून हुंदके आणि रडू कोसळते. त्या बरोबरच ती नागिण पुन्हा खडी होते. त्यामुळे आल्या पावली सगळ्यांना पळतच सुटावे लागते.

अगदी कोल्हापूर गाठेपर्यंत राणूच्या मृत्यूबद्दल आपणच दोषी आहोत असे अशोकला वाटत राहते. राधाक्का अशोकला दोष देऊन शिव्या देते. तिच्या पोरीही शिव्या देऊ

लागतात. त्या धोंडमार करु लागतात. काही मैल ते मागे व अशोक पुढे, अशोक मागे तर ते पुढे होत होते. राणूच्या मृत्यूनंतर घडून आलेल्या बदलामुळे अशोकला त्यांच्या बरोबरीने चालणेही कठीण होते. झक् मारली आणि ह्या बेवारशी टोळक्यांची संगत धरली, असे त्याला वाटू लागते. आजची रात्रही कोल्हापूर पाहायला मिळणार नाही या विचाराने अशोक उदास होतो. तुटलेले सख्य जुळण्यासाठी बिचाऱ्या राधाक्कावर अजून संकटे यायची होती. कासेगावजवळ पोहोचल्यानंतर एक मस्तवाल खोंड उधळत पुढे येतो. रस्त्यातून येणाऱ्या एका ट्रकाला तो करकचून ब्रेक दाबायला भाग पाडतो. शिवाय एका सायकलस्वारास रस्त्यावर लोळवतो आणि सरळ चंदरच्या पुढ्यातच येऊन उभा राहतो. तो चंदरला केवळ पाडत नाही तर त्याच्या बरगड्यावर ताकदीने आपला खूर उठवितो. राधाक्का रस्त्यावर बैलाने तुडवून टाकलेल्या पोराकडे धावत येते. अशोकही धावतच तेथे पोहोचतो. रस्त्यात पडून तडफडणाऱ्या, क्षीणपणे आक्रंदणाऱ्या चंदरला अशोक उचलतो. दोन-तीन तरी बरगड्या मोडल्या असणार ह्यात शंका नसते. अशोकला तो ट्रक डायव्हर चंदरला घेऊन गाडीत बसण्यास सांगतो. त्यांच्याबरोबर असलेल्या बायजीला सुद्धा गाडीत बसण्यास सांगतो. अशोकचे सारे लक्ष चंदरकडे असते. कासेगाव अजून मैलभर लांब असते. ट्रक ड्रायव्हर मात्र बायजीला डिवचू लागतो. तिच्या फाटक्या झग्यातील पुठ्ठ्याला आणि थानांना चिमटे घेऊ लागतो. बायजीचा त्याला प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे संगळ्यांना तो थोड्यापूर्वी दया दाखवणारा ड्रायव्हर आता सगळ्यांना खाली उतरतो. बायजीने अंगाशी चाळे करु दिले असते, तर त्याची दयाबुद्धी खासच आटली नसती.

गावात डॉक्टरला शोधत एका डॉक्टरला सर्वजण भेटतात. गावात तो एकच डॉक्टर असतो. अशोककडे पैसे नसल्याने तो कसलेतरी एका गचाळ कागदात पिवळे चिक्ट मलम देतो. मुख्य रस्त्यावर येऊन रस्त्याच्या कडेला येऊन त्या दुर्दैवी पोराच्या फासळ्याला तो चोळतो. राधाक्का त्या पोराला घेऊन हमसून रडू लागते. एका आईवर लागोपाठ तीन पोरे पाहता पाहता मेलेली पाहण्याचे दुर्भाग्य कोसळलेले असते, ती देवाला शिव्या देऊ लागते. फर्लांगभर अंतर चालून गेल्यावर सर्वांनाच भुकेची आठवण होते. मिळेल ते पाणी प्यावे आणि गुडूप झोपी जावे अशीही अनिवार इच्छा होते. रस्त्याकडचे छोटेसे चहापाणी, शेवभजी

देणाऱ्या हॉटेलपुढे सर्वजण येऊन थांबतात. ते नेर्ले गाव असते. रात्रीचे अकरा वाजलेले असतात. त्या दोन पोरींची हॉटेलात असलेल्या शेवेच्या बरणीवर लक्ष जाते. विठ्ठल तर रडायलाच लागतो. शेव मागू लागतो. मूठभर शेवेसाठी त्या हॉटेलमधील दाढी वाढवलेल्या आणि रोगटसा वाटणाऱ्या चिपाडासारख्या माणसाला राधाक्का आजपर्यंत जपून ठेवलेले स्वत:जवळचे चारित्र्य विकून मोडीत काढणार असते. आपल्या बरोबर असणाऱ्या अशोकला ती म्हणते, ''आस्सुक्या, पोरांची मी निस्ती वज्जी घेटली, पर दुकन्याचं वज्जं न्हाई घेता आलं... आता तुमच्या पोटाच्या भुकेचं वज्जं घेती मी... तू डोक्याचा पोरगा हायीस... कळता हायीस... मला बोल लावू नगं.''[१] अशोकच्या मनात ह्या प्रकरणाने निराशा येते. त्याचे सर्वांग ठणकायला लागते. ते सारे त्याच्या डोक्याबाहेरचे आणि असह्य होते. त्या दिवशीचा चवथा मुडदा तिथे गंजीत सांडला-राधाक्काच्या चारित्र्याचा मुडदा ! त्या दिवशी रात्रभर अशोकला आणि राधाक्काला झोप लागत नाही. त्या बाटलेल्या जागेवर एक क्षणही थांबायचे नाही असे ते ठरवितात. पहाटेच्या आधीच ते तेथून निघतात. सकाळ होते . थोडासा अंधार मात्र असतो. एक छोटीशी मोटार येते आणि त्यांच्याजवळ थांबते. रामप्रहरी त्या कामांध पुरुषाने राधाक्काच्या हात इतक्या झपाट्याने मोटारीत ओढतो की अनपेक्षितपणे राधाक्का मोटारीतच जाऊन पडते. तो नीच माणूस दार बंद करुन घेऊ लागतो. ''आक्का!'' असे किंचाळत अशोक मागचा पुढचा विचार न करता ओढलेल्या दाराला झटू लागतो. दाराच्या मध्ये अंग घुसवून त्या नराधमाची तो मफलर ओढतो. आपल्या वाढलेल्या नखाने त्याच्या गळ्याची सालटे काढू लागतो आत राधाक्का वाघिणीसारखी झेप घेते आणि त्याचे केस ओढून त्याच्या दंडाचा चावा घेते. त्या दंडाचा लचकाच आपल्या दाताने तोडते त्यामुळे भेदरलेला तो माणूस राधाक्काला गाडीतून ढकलतो. दुसऱ्या हाताने अशोकच्या तोंडावर थप्पड मारतो आणि ताकदीनिशी दार ओढून घेतो. क्षणार्धातच मोटार सुसाट वेगाने पळत सुटते. हा प्रसंग पाहता पाहता केव्हा घडून जातो, हे कोणालाच समजत नाही. अशा परिस्थितीत छातीच्या फासळ्या मोडलेल्या चंदरचा त्रास आणखी वाढत जातो. अचानकच येलूरच्या खिंडीत तो थंड थंड होत जातो. राधाक्का निमुटपणे खाली बसते. तिच्या भोवती सर्वजण चंदरकडे पाहत बसतात. इतक्यात ''ये ! कोन तुमी ? हातं काय करतायसा

बसून?'' एक खणखणीत राकट आवाज येतो. ''आगं बाई, फरारी दिसतूया!'' राधाक्का दचकून आणि घाबरुन उद्‌गारते. सर्वजण भीतीने गारठतात. भीतीने गयावया करीत हात जमीनीवर आपटीत जोडत म्हणते, ''दादा... माज पोरगं मराय लागलया... आमी देसूधडीला लागल्याली म्हारं हाय... हातनं ततं, ततनं हातं लाता खात चालूया घरला!''[१०] चंदरच्या त्या मरणाला टेकलेल्या अवस्थेकडे पाहून त्या फराऱ्याला दया येते. चंदरला मेल्यानंतर हाच फरारी त्याला मातीत गाडायला मदत करतो. आपल्याजवळच्या बांधून आणलेल्या चांगल्या आठ-दहा भाकरी आणि त्यावर परतलेली डाळ, शिळी भजी काढून देतो. 'कुठतरी बसून खावा जावा', असे म्हणत 'माझ्याविषयी कुणाला बोलू नका', असे म्हणत तो दयाळू गुन्हेगार निघून जातो. माणुसकीने भरलेल्या त्या पांगळ्या फराऱ्याने कोणता गुन्हा केला असेल, असा प्रश्न अशोकला पडतो.

खिंडीतून रस्त्यावर आल्यानंतर तांदूळवाडी येते. वारणेचा पूल पार केल्यानंतर आता आपण कोल्हापूरजवळ येत आहोत, ह्याचा आनंद अशोकला होऊ लागतो. किणी घुणकी झाल्यावर अशोकच्या परिचयाचे वाठार येते. ह्याच वाठारवरून वडगावकडे फाटा जात असतो. ह्या भागात अशोक कितीतरी वेळा वांड, टारगट मुलांच्याबरोबर भटकलेला असतो. या फराऱ्याने दिलेली भाकरी ह्या ठिकाणी बसून सर्वजण खातात. तासाभराने पुन्हा सर्वजण चालू लागतात.

अंबपच्या फाट्यावर राधाक्का नाक शिंकरत म्हणते, ''आमी असं उजवीकड हुनार तू म्होरं जानार.'' एकटेपणाची जडशीळ भावना दाटून आलेली असते. रस्त्याकडेलाही अशोकला दंडाला धरुन बसवते. दोन्ही तळवे अशोकच्या गालावरून सावकाश फिरवत ती आपल्या कानशिलावर मोडते आणि त्याच्या खांद्यावर हात टाकून रडू लागते. अशोक जायला निघतो त्यावेळी पुन्हा राधाक्का करुण हेल काढत ओरडते, ''आस्सुक्या, हाकडं यी. लेकरा, जरा वाईच यी... माज्यापाशी बस.''[११] अशोक मागे येतो. पुन्हा तिच्याजवळ बसतो. आपल्या लुगड्याच्या फाटक्या जीर्णशीर्ण कपड्याने अशोकचे धुळीने भरलेले तोंड पुसते. रडत रडतच ती अशोकला उपदेश करते.

हळूहळू ते चौघे (पूर्वी सातजण होते भेटले तेव्हा) अंबपच्या दिशेने चालू लागतात. ''आसुक्क्या ! '' पुन्हा एकदम तिची खूप दुरुन दीर्घ किंकाळी ऐकू येते. अशोकच्या बालमनाला राधाक्काची - आपल्या मानलेल्या आईची किंकाळी जाऊ देत नसते. अशीच किंकाळी राधाक्काने राणू व चंदर ही तिची मुले मेल्यावर ठोकली होती. एरव्ही राधाक्का अशोकची मानलेली आई सर्वांच्यापुढे असायची आता ती मागे राहिली होती. तिची हडकुळी क्षीण काया अगदी करंगळीएवढी दिसत होती. तिचा एक हात वर दिसतो आणि दुसरा हात डोळ्यावर दिसतो. मागोमाग पुन्हा एकदा किनरी किंचाळी माळरानावर उठते...

''आसुक्क्या ऽऽ! जा बर्का बाबा जा...!'' मग पुढच्याचं वळणावर अशोक वळतो. मागचे सारे काही अदृश्य होते. त्यांना आपण मेलो किंवा ते आपल्याला मेले किंवा आपण सारेच संपलो... मागचे मागेच पडले. कोल्हापूर जवळ आले असताना एक मिनिटभरही थांबायला त्याचे पाय तयार नव्हते.

## ३.४. समारोप :

अशाप्रकारे 'मेलेलं पाणी' (१९८२) ह्या कादंबरीत ढोर समाजाचे चित्रण करण्यात कांदबरीकार कमालीचा यशस्वी ठरला आहे. संपूर्णपणे उपेक्षित असा ढोर समाज हा कातडी कमावण्याचा व्यवसाय करणारा आहे. खेड्यापाड्यातील जातीयवाद, राजकारण, अज्ञान इ.चा परिणाम होत जाऊन हा समाज लोकशाहीत हतबल झाला आहे. हे कांदबरीकाराने आपल्यासमोर यथार्थ शब्दात व्यक्त केले आहे.

तसेच '७२ मैल' (१९८९ ) ह्या कादंबरीच्या कादंबरीकाराला बालपणी सातारा ते कोल्हापूर या तीन दिवसाच्या पायी प्रवासात त्याच्या आईच्या वयाला शोभेल अशी एक स्त्री भेटते. कादबंरीकाराचे बालमन तिला आई मानते. तिचे नाव राधाक्का असते. राधाक्काच्या निमित्ताने कादंबरीकाराला जगाचे, जीवनाचे जे विदारक दर्शन घडते त्याचा मन थरकावून टाकणारा अनुभव म्हणजे '७२ मैल' ही कादंबरी. राधाक्काच्या दु:खाची जखम वाचकांना बरेच दिवस आठवत राहील, हेच त्या कांदबरीचे बलस्थान होय. कादंबरीकार ते चित्रित करताना कमालीचा यशस्वी ठरला आहे.

## ३.५ संदर्भ व टीपा :

१. पहा : व्हटकर अशोक 'मेलेलं पाणी', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती : १९८२, पृ.५.

२. तत्रैव, पृ. १६.

३. तत्रैव, पृ.३९.

४. तत्रैव, पृ. ४३.

५. तत्रैव, पृ. ६३.

६. तत्रैव, पृ. ६७.

७. पहा : व्हटकर अशोक '७२ मैल', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती : १९८९, पृ.१५.

८. पहा :तत्रैव, पृ. ४०.

९. तत्रैव, पृ. १०७.

१०. तत्रैव, पृ. ११६.

११. तत्रैव, पृ. ११९.